# तरुण भारत

शनिवार दि. ६ फेब्रुवारी २०२१


## राष्ट्रीय कार्यशाळा उत्साहात

**शाहूपुरी :** रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार इतिहास विभागाच्या माध्यमातून नुकतीच एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी इतिहास विभाग प्रमुख डॉ. डी. बी. मासाळ यांनी कार्यशाळेचे प्रास्ताविक केले. उदघाटक म्हणून जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली येथील कोरियन भाषा विभागप्रमुख प्रा. रविकेश तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अनिसा मुजावर या उपस्थित होत्या.

## भूगोलात करियरची संधी–जाधव

**सातारा :** रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये भूगोल विभागामार्फत भूगोल दिन मोठ्या उत्साहात ऑनलाईन प्रणालीद्वारे आयोजित करण्यात आला. प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. बाळासाहेब जाधव यांनी विद्यार्थ्यांना भूगोलातील करीयरच्या संधी याविषयी मार्गदर्शन केले. मानवाच्या यशस्वी जीवनात भूगोल विषयाची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण कशी आहे हे विद्यार्थ्यांना सांगितले. यावेळी भूगोल विभाग प्रमुख डॉ. सुरेश झोडगे, प्रा.डॉ. ए. एस. पाटील उपस्थित होते.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.